कालावधी ६ वर्षांचा असेल. संरक्षण कालावधी पुनर्परीक्षणानंतर उरलेल्या कालावधीकरीता नुतनीकरण शुल्क भरुन प्राधिकरण पुढील अटींच्या आधीन राहून देऊ शकते.

१. वृक्ष व वेल वर्गीय वाणांचा संरक्षण कालावधी १८ वर्ष आहे.

२. इतर प्रचलीत प्रसारीत पीक वाणांकरिता बियाणे कायदा, १९६६ नुसार नोंदणी झाल्याच्या दिवसांपासून १५ वर्ष आहे.

३. इतर पिकवाणांकरिता हा संरक्षण कालावधी प्राधिकरणाकडे नोंदणी झाल्याच्या दिवसांपासून १५ वर्षांकरिता असतो.

अशाप्रकारे प्राधिकरणाकडे आपर्यंत विविध प्रकारच्या पीक वाणांचे व शेतकऱ्यांचे सप्टेंबर, २०११ अखेर एकूण ३३२० अर्ज नोंदणीकरिता प्राप्त झाले आहेत.

## राष्ट्रीय पीकवाण नोंदवही : (National Register of Plant Varieties)

राष्ट्रीय पीकवाण नोंदवही प्राधिकरणाच्या मुख्यालयी ठेवलेली असून त्यामध्ये संरक्षित पीकवाणांच्या नावानिशी सविस्तर माहितींची नोंद ठेवण्यात येते. जसे संरक्षित पीक वाणांच्या पीक पैदासकारांची नावे, त्यांचे पत्ते, पीक वाणाचा संरक्षित प्रकार, संरक्षित पीक वाणांच्या संदर्भातील पीक पैदासकाराच्या हक्कांचा प्रकार, संरक्षित पिकवाणाचे नोंदणी दरम्यानची नावनोंदणी, संरक्षित पीक वाणाचे बियाणे अथवा पुनरुत्पादनक्षम इतर भाग व त्या संदर्भातील इतर महत्वाची प्रसारित करणेयोग्य आवश्यक माहिती यांची नोंद सदर नोंदवहीमध्ये ठेवण्यात येते.

## राष्ट्रीय जनुकिय कोष : (National Gene Bank)

प्राधिकरणाव्दारे राष्ट्रीय जनुकिय कोषाची स्थापना करण्यात आलेली आहे. या कोषामधे संरक्षित पीक वाणाचे बियाणे तसेच पीक पैदासकाराने नोंदणी करण्यासाठी जमा करण्यात आलेल्या वाणांच्या मातृ जाती याची साठवणूक व जपवणूक करण्यात येते. संरक्षित कालावधीकरीता सदर बियाणे ५° से. तापमानास साठविले जाते आणि वेळ पडल्यास काही वर्षांनंतर कोषातील अशा बियाणांचे पुनरुत्पादन घेऊन पुनर्निर्मिती अर्जदाराच्या नोंदणीशुल्कातील पैशातून करण्यात येते. कोषातील संरक्षित बियाणांचा काही तंटा निर्माण झाल्यास तंटा सोडविण्यासाठी अथवा सक्तीची नोंदणी करण्यासाठी उपयोग होणार आहे. राष्ट्रीय जनुकीय कोष व्यवसायिक बियाणे उद्योगातील गैरप्रकारांना रोखण्यासाठी व कायद्यांचे उल्लंघन रोखण्यासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. संरक्षित पीक वाणाचा संरक्षण कालावधी संपल्यानंतर जनुकीय कोषातील त्याचे साठवणूक केलेले बियाणे जनतेच्या वापराकरीता कालापरत्वे खुले होइल.

## राष्ट्रीय जनुकिय निधी : (National Gene Fund)

- प्राधिकरणातर्फे राष्ट्रीय जनुकिय निधीची निर्मिती करण्यात आलेली असून निधीचा स्त्रोत खालील प्रमाणे असेल.
- पीक पैदासकारांकडून त्यांच्या संरक्षित वाणांच्या फायद्यातून निर्धारीत पद्धतीने किंवा संरक्षित वाण अथवा त्यांचे पुनरुत्पादनक्षम भागाच्या फायद्यातील निर्धारीत रक्कम
- स्वामित्व शुल्का मार्फत प्राधिकरणाकडे जमा होणारे वार्षिक शुल्क
- पीक पैदासकारा कडून प्राधिकरणाकडे जमा होणारी मोबदला रक्कम
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व इतर संस्थामार्फत प्राधिकरणाला होणारी अर्थिक मदत

### जनुकिय निधीचा विनियोग पुढील गोष्टींकरिता केला जाऊ शकतो.

- फायद्यातील मोबदला रक्कम अदा करण्याकरीता
- शेतकरी/शेतकरी समुहाला नुकसान भरपाई अदा करण्याकरिता
- जनुकिय संसाधनांच्या संवर्धनासाठी व शाश्वत पुरवठ्यासाठी पाठबळ

देण्याकरिता करण्यात येणाऱ्या खर्चासाठी देशांतर्गत व देशाबाहेरील संकलनासाठी, पंचायतींच्या संसाधनांच्या संवर्धनासाठी, शाश्वत वापराकरिता व बळकटीकरणाकरीता या जनुकिय निधीचा वापर होणार आहे.

## नफ्यातील वाटा (Benefit Sharing) :

पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायद्यांतर्गत नफ्यातील वाटा हा शेतकऱ्यांच्या हक्कांचे संवर्धन करणारा सर्वात महत्वाचा मुद्दा अंतर्भुत करण्यात आला आहे. या कायद्यातील कलम २६ अन्वये नफ्यातील वाट्याच्या हक्कासाठी भारतीय व्यक्ती किंवा संस्था किंवा अशासकीय संस्था की जी देशामधील स्थानिक असून देशातच प्रस्थापित झालेली असेल. नफ्यातील वाटा मागणाऱ्या हक्क धारकाच्या जनुकिय संसाधनांचा एखादा नवीन पीक वाण निर्मितीकरीता एखाद्या पीक पैदासकाराने किती प्रमाणात व कसा वापर केला आणि त्या उत्पादीत वाणाची व्यवहाराकरीता व बाजारातील मागणी लक्षात घेवून सदरहू पीक पैदासकार त्याला झालेल्या नफ्यातील वाटा हक्क धारकास अदा केला जाइल. अशाप्रकारे प्राधिकरण प्रमाणपत्र वितरीत करीत असताना त्या संदर्भातील विविध माहिती प्रकाशित करुन नफ्यातील वाट्याच्या हक्क धारकांसाठी त्यांनी पुढे येण्यासाठी भारतीय पीक वाण नियतकालीकां मार्फत प्रोत्साहित करीत असते.

## समुदयाचा हक्क (Community Rights):

प्राधिकरणामार्फत एखाद्या गावाचा किंवा ग्रामीण समुदायाचा संरक्षित पीक वाण निर्मितीकरीता दिलेल्या योगदाना बद्दलचा हा एक प्रकरचा मोबदला आहे.

भारतातील कोणत्याही गावाचा अथवा ग्रामीण समुदयाचा जनप्रतिनिधी म्हणून एखादी व्यक्ती किंवा व्यक्ती समुह किंवा शासकिय अथवा अशासकीय संस्था कोणत्याही अधिकृत केंद्राकडे त्यांच्या या संवर्धनाच्या योगदाना बद्दल मोबदल्या साठी अर्ज करु शकते.

## सहयोगी देश (Convention Countries)

आंतरराष्ट्रीय पीक वाण संरक्षणांच्या तरतुदींचे पालन करणाऱ्या देशाला सहयोगी देश म्हणून संबोधले जाते. कारण याच तरतुदींच्या आधीन राहून भारताने आपले पीक वाण संरक्षित केले आहेत. दोन्ही देशांचे नागरिकत्व असलेल्या पीक पैदासकाराला पीक वाण प्राधिकरण संरक्षण हक्क प्रदान करु शकते. एखाद्या पीक पैदासकाराने सहयोगी देशामधे एखाद्या पीकवाण संरक्षणार्थ अर्ज दाखल केल्यापासून एक वर्षाच्या आत (तारखेच्या बारा महिने कालावधीच्या आत) भारतामधेही तोच पीकवाण संरक्षित करण्यासाठी अर्ज करुन त्या पिकवाणास संरक्षित केले असल्यास त्याने सहयोगी देशात नोंदणी करीता दाखल केलेल्या आर्जच्या तारखेपासून सदर पीकवाणास भारतातही संरक्षित केल्याचे गृहीत धरण्यात येइल व हीच तारीख नोंदणीकरणाची तारीख म्हणून ग्राह्य धरली जाईल.

## पीक वाण संरक्षण अपीलीय न्यायधिकरण (Plant Varieties Protection Appellate Tribunal)

पीकवाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरणाचे पीक वाण संरक्षण अपीलीय न्यायाधिकारणाद्वारे नियंत्रण केले ाईल. प्राधिकरणाच्या (एक हस्तक अथवा नोंदणीकर्ता या नावाने) कुलसचिवांमार्फत निर्गमित संरक्षित पीक वाणांसंदर्भातील सर्व प्रकारचे निर्देश अथवा निर्णयासंदर्भात या न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. त्याचबरोबर प्राधिकरणाने नफ्यातील वाट्यासंदर्भात, सक्तीच्या नोंदणीसंदर्भात आणि नुकसान भरपाई संदर्भात दिलेले निर्देश अथवा निर्णयासंबंधी अपील या न्यायाधिकरणाकडे करता येईल. सदर न्यायाधिकारणाची स्थापना होईपर्यंत बौद्धीक स्वामित्व अपीलीय बोर्डा कडे वरील बाबींकरीता दाद मागता येईल व या बोर्डाच्या कक्षेत वरील बाबींची कार्यवाही सुरु राहील. पीक वाण संरक्षण अपीलीय न्यायाधीकरणाकडील निर्णयांसर्भात उच्च न्यायालयाकडे दाद मागता येईल. सदर न्यायाधिकरणाने आलेल्या अपीलांचा निपटारा एक वर्षाच्या आत करणे अभिप्रेरीत आहे.


**संपर्कासाठी पत्ता**

**पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण,**
**एस. २, अे ब्लॉक, एन. ए. एस.सी. संकुल, देव प्रकाश शास्त्री मार्ग,**
**नवी दिल्ली -११००१२**
फोन नं. - ०११-२५८४३३१५, २५८४०७७७, २५८४३८०८
फॅक्स - ०११- २५८४०४७८
Website : www.plantauthority.gov.in,
E-mail : ppvfra-agri@nic.in



प्रकाशक
**डॉ. सुभाष मेहेत्रे**
संशोधन संचालक,
म.फु.कृ.वि., राहुरी

संकलक
**डॉ. रावसाहेब भारुड**
प्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग,
म.फु.कृ.वि., राहुरी

सह संकलक
**डॉ. मारोतराव मांजरे**
प्रमुख, शास्त्रज्ञ, (बियाणे),
म.फु.कृ.वि., राहुरी

लेखक
**डॉ. विजय शेलार**
बियाणे संशोधन अधिकारी
**श्री. अविनाश कर्जुले**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक
म.फु.कृ.वि., राहुरी

संशोधन संपादक
**डॉ. डि. पी. कलेढोणकर**

(अनुवाद संदर्भ : पीक वाण संरक्षण शेतकरी हक्क प्राधिकरण घडीपत्रिका/४,२०११ )



फक्त प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उपयोगासाठी, तांत्रिक व कायदेशीर बाबींकरीता प्रतीबंधीत



कार्यालयीन उपयोगाकरीता MPKV/Res.Pub.No.54/2012


# पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा - २००१



**पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण**
**कृषि मंत्रालय**
**भारत सरकार**
एस. २, अे ब्लॉक, एन.ए.एस.सी. संकुल, देव प्रकाश शास्त्री मार्ग, नवी दिल्ली - ११००१२

बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजना
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## प्रस्तावना :

पीक पैदासकार व शेतकऱ्यांच्या हक्काकरीता एक कायदेशीर प्रणाली भारत सरकार तर्फे तयार करण्यात आलेली आहे. पीक पैदासकार व शेतकरी यांचे नवनवीन वाण निर्मिती व जैव विविधता टिकविण्यासंदर्भात हे महत्त्वाचे काम आहे. पीक पैदासकार व शेतकरी यांना नवीन वाण विकसीत करण्यास प्रोत्साहन देण्याकरीता सदर प्रणाली स्थापित केलेली आहे. नवीन पीक वाण तयार करणे, त्यांचे संवर्धन व जतन करणे व त्या मध्ये सुधारणा करणे या कामी पीक पैदासकार, शेतकरी यांचे योगदान फार मोलाचे आहे. त्यांच्या हक्कांचे कायदेशीर संरक्षण करण्याकरिता भारत सरकारने पीकवाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा, २००१ या वैशिष्ट्यपूर्ण कायद्याची निर्मिती केलेली आहे. या कायद्याव्दारे भारत सरकार आंतरराष्ट्रीय नवीन पीक वाण संरक्षण कायदा , १९७८ (UPOV) चे पालन तर करणारच त्या बरोबरच देशातील सरकारी व खाजगी क्षेत्राचे, संशोधन संस्थांचे व शेतकरी वर्गाच्या हक्कांचे विविध तरतुदींव्दारे संरक्षण करणार आहे. ही कायदेशीर प्रणाली देशातील पीक पैदासकार व शेतकरी यांचे नवीन वाण विकसित करण्याकरिताचे योगदान ओळखून त्यांचे बौध्दिक स्वामित्वाने संरक्षण (TRIPS) करण्या बरोबरच नवनवीन वाण विकसित करण्याकरीता मोलाचे योगदान देणाऱ्या देशातील सरकारी व खाजगी संस्था, संशोधन केंद्रे व मूळ स्त्रोताचे संवर्धण करण्या बरोबर शेतकऱ्यांना सामाजिक व आर्थिक पाठबळ देण्याचेही कार्य करणार आहे.

या कायद्याच्या तरतुदींचे व्यवस्थित परिचलन करण्याकरीता कृषि मंत्रालयाच्या कृषि व सहकार विभागाने ११ नोव्हेंबर २००५ रोजी पीकवाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरणाची निर्मिती केली आहे. त्याचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे कार्य करतात. या सोबतच प्राधिकरणामध्ये भारत सरकारने नियुक्त केलेले १५ सदस्य असतात. यांपैकी ८ सदस्य विविध विभागांचे/मंत्रालयांचे प्रतिनिधित्व करतात, ३ सदस्य राज्यांच्या कृषि संस्थांचे वा राज्यांचे प्रतिनिधित्व करतात. केंद्र सरकार या प्राधिकरणामधे शेतकऱ्यांचे, आदिवासी संस्थांचे, बियाणे उद्योगांचे व कृषि विभागाशी निगडीत महिला संस्थांचे प्रत्येकी एक सदस्य नियुक्त करते. कुलसचिव जनरल हे या प्राधिकरणाचे प्रधान सचिव म्हणून काम पहातात.

## पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा, २००१ चे प्रमुख उद्दिष्ट्ये -

१) या कायद्यांतर्गत शेतकरी व शास्त्रज्ञांच्या हक्कांच्या संरक्षणार्थ सक्षम संरचना स्थापन करणे व कृषि विकासास गती देण्यासाठी विविध पिकांच्या नवीन वाण निर्मितीस उत्तेजन देणे.

२) पीक अनुवंशिक साधनांचे संवर्धन, त्यांची सुधारणा व पिकांच्या नवीन वाण विकसित करताना उपलब्धतेच्या मोलाच्या कार्यासाठी शेतकऱ्यांच्या हक्कांची जाणीव व संरक्षण करणे.

३) पीक पैदासकारांच्या हक्कांचे संरक्षण करुन खाजगी व सरकारी क्षेत्रातील संशोधनास उत्तेजन देऊन संशोधन व गुंतवणुकीस चालना देणे व नवनवीन पीक वाण विकसीत करणे.

४) देशातील बियाणे उद्योगाची झपाट्याने प्रगती करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे जेणे करून शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे शुद्ध व दर्जेदार बियाणांची पेरणीच्या वेळी उपलब्धता होईल.

## प्राधिकरणाचे महत्त्वाचे कार्य :

१) प्रचलीत प्रसारीत वाणांची व नवीन पीक वाणांची नोंदणी करणे.

२) नोंदणीकरीता वाणातील वेगळेपणा, एकसारखेपणा आणि स्थिरता यांच्या चाचणी मानकांची नवीन पिकांसाठी निर्मिती करणे.

३) नोंदणी झालेल्या पीक वाणांचे वर्गीकरण व नोंदणीकरण करणे.

४) सर्व पीकवाणां करीता सक्तीची पटनोंदणीची सोय उपलब्ध करणे.

५) अनुक्रमिता, नोंदणीकरण व पटनोंदणीची सेवा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देणे.

६) उपयुक्त पिकांचे व त्यांच्या जंगली वाणांच्या पीक अनुवांशिक साधनांचे संवर्धन, सुधारणा करणाऱ्या आदिम जमातींचे, गाव समुहांचे व शेतक-यांचे त्यांच्या योगदानाची जाणिव ठेवून त्यांचा यथोचित सत्कार करणे.

७) पीक वाणांच्या राष्ट्रीय संकलनाचे जतन करणे.

८) राष्ट्रीय जनुकीय कोषाची जपवणूक करणे.

## पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायद्यातील विविध हक्क :

### पीक पैदासकार हक्क (Plant Breeders Rights) :

पीक पैदासकारास त्याने निर्मित केलेल्या वाणास पुरेसे संरक्षण देण्यात येणार आहे. संरक्षित वाणाचा कोणत्याही प्रकारे वापर करणे, विक्री करणे, मोठ्या प्रमाणात लागवड करुन उत्पन्न घेणे, त्या वाणाची आयात व निर्यात करणे, त्या वाणाचे अधिकार पत्र दुसऱ्यास देणे याचे संपुर्ण अधिकार त्या पीक पैदासकारास प्रदान करण्यात आले आहेत.

### संशोधकांचा हक्क (Researcher Rights) :

संशोधन करण्यास व नवीन वाण विकसित करण्यास संशोधकास संरक्षित वाणाचा वापर करण्याची मुभा या कायद्याअंतर्गत प्रदान करण्यात आली आहे; परंतु त्या संशोधकाकडून त्याच संरक्षित वाणाचा वापर पुन्हा पुन्हा होत असेल अथवा त्या वाणाचा वापर व्यावसायिक दृष्ट्या नवीन वाण तयार करण्यासाठी होत असेल तर त्या संशोधकास संरक्षित वाणाच्या मालकांकडून अधिकारपत्र घेणे बंधणकारक राहील.

### शेतकऱ्यांचे हक्क (Farmer's Rights):

* जे शेतकरी नवीन वाण विकसित करण्यात योगदान करतात त्यांना पीक पैदासकारांप्रमाणेच नोंदणीकरण व संरक्षण देण्यात येईल.
* शेतकऱ्यांच्या वाणाचे प्रचलीत वाण (Extant variety) म्हणून नोंदणीकरण करता यईल.
* शेतकरी, संरक्षित वाणाचा कोणत्याही प्रकारे वापर करणे, विक्री करणे, मोठ्या प्रमाणात लागवड करुन उत्पन्न घेणे, त्या वाणाची देवाण घेवाण करणे पूर्वी प्रमाणेच करु शकतील मात्र संरक्षित वाणाची शेतकरी बंद पिशवी मध्ये अधिकृत नावाने विक्री करु शकणार नाहीत.
* शेतकरी, पिकांच्या अनुवांशिक साधनांच्या संवर्धन करण्यात, देशी (गावठी) प्रजाती व विविध मौल्यवान पिकांच्या जंगली प्रजातींच्या संवर्धनाच्या योगदानासाठी बक्षिस पात्र असतील.
* एखादा संरक्षित वाण अपेक्षित गुणवत्ता देऊ शकला नाही तर शेतकरी सदर कायद्याच्या कलम ३९(२) अन्वये नुकसान भरपाईस पात्र असेल.
* शेतकऱ्यांना सदर कायद्यान्वये प्राधिकरणाच्या कार्यप्रणाली दरम्यान, न्यायिक मंडळा समोर अथवा न्यायालयींन शुल्क भरणे बंधनकारक नसेल.

## नोंदणीकरण (Registration):

| | |
|---|---|
| * ज्या पीक वाणाची नोंदणीकरण करावयाचे आहे त्या वाणाने वेगळेपणा (Distinctness), एकसारखेपणा (Uniformity), स्थिरता (Stability), (DUS) या निकषांची पुर्तता करणे आवश्यक असते. केंद्र सरकार त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणीकरीता आलेल्या वाणांसंबंधी नोंदणीच्या दृष्टीने शासकीय परिपत्रकात माहिती प्रकाशित करते. | **प्राधिकरणाची विविध प्रकाशने :**<br>● भारतीय पीक वाणनियतकालीक<br>● सर्वसाधारण व पीक निहाय DUS चाचणी मार्गदर्शीका.<br>● प्राधिकरणाची तांत्रिक पुस्तीका<br>● जनुकीय कोष नियतकालीत<br>● कृषि जैव विविधता तीव्र क्षेत्र पुस्तीका (दोनखंड) |
| * आजतागायत केंद्रसरकारने विविध ५४ पिकवाणांसाठी नोंदणीकरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्या करिता पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरणाने वेगळेपणा (Distinctness), एकसारखेपणा (Uniformity), स्थिरता (Stability), (DUS) तपासणी करीता पिकनिहाय मार्गदर्शक तत्वे विकसित केले आहेत. या पिकांमध्ये गहू, साळ, मका, वारी, बाजरी, हरभरा, तूर, मुग, उडीद, मटकी, वाटाणा, मसुर, कपाशी, ज्यूट, ऊस, आले, हळद, मोहरी, आंबाडी, जवस, सुर्यफुल, करडई, एरंड, तीळ, भुईमुग, सोयाबीन, काळी मिरी, विलायची, गुलाब, शेवंती, आंबा, बटाटा, टोमॅटो, वांगे, भेंडी, फुलकोबी, कोबी, कांदा, लसून, इसबगोल, दमास्क गुलाब, ब्राम्ही, मंचाल इत्यादी पीकांचा समावेश आहे. | ● "उदर निर्वाहासाठी बियाणे" नावाची सीडी जी प्राधिकरणासंदर्भातील विविध कार्यप्रनालींची संकलीत माहिती देते<br>● वार्षिक संकलन पुस्तिका |

## नोंदणीकरीता आवश्यक नोंदणीशुल्क :

पिकवाणाच्या नोंदणीकरिता आर्जासोबत प्राधिकरणाने निश्चित केलेली नोंदणीशुल्क रचना खालील प्रमाणे :

| अ.नं. | पिकवाणाचा प्रकार | नोंदणीकरिता आवश्यक शुल्क |
|---|---|---|
| १. | बियाणे कायदा १९६६ मधील भाग ५ मध्ये नोंदणीकृत प्रचलीत वाण (Extant Variety) | रु. १०००/- |
| २. | नवीन वाण/प्रचलीत वाणांचा वापर करुन पुनरुत्पादीत वाण (Essentially Derived Variety) | व्यक्तीगत रु. ५०००/-<br>शैक्षणिक संस्था रु. ७०००/-<br>व्यवसायिक रु. १०,०००/- |
| ३. | प्रचलित वाण याबद्दल सर्वांना माहिती आहे. (Variety of Common Knowledge) | व्यक्तीगत रु. २०००/-<br>शैक्षणिक संस्था रु. ३०००/-<br>व्यवसायिक रु. ५,०००/- |

वार्षिक नुतनीकरण फी भरुन संरक्षित वाणाचा नुतनीकरण कालावधी कालापरत्वे वाढवता येईल.

## DUS चाचणी केंद्र :

प्राधिकरणाकडे विविध पिकांच्या वेगळेपणा (Distinctness), एकसारखेपणा (Uniformity) व स्थिरता (Stability).(DUS) चाचणीकरता आजतागायत ५२ चाचणी केंद्रांची उपलब्धता असून संदर्भ वाणांची गुणन व संवर्धनाच्या प्रमुख उष्ठिांसह ही चाचणी केंद्र डस डिस्क्रीपटरमध्ये प्राथमिक सांख्यिकीय माहितीच्या निर्मितीचे काम करतात. सदर चाचणी केंद्राची सविस्तर माहिती प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

## भारतीय पीक वाण नियतकालीक (Plant Veriety Journal of India) :

प्रतिमाह व्दैभाषेत (हिंदी आणि इंग्रजी) भारतीय पीक वाण नियतकालीक (PVJ) नावाचे मासिक प्राधिकरणामार्फत प्रकाशित करण्यात येते आणि जनतेकरीता प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर महिन्याच्या पहिल्याच तारखेला ते उपलब्ध करुन देण्यात येते. या नियतकालीकाला राजपत्राचा दर्जा प्राप्त असून याव्दारे संरक्षीत पिकवाणांसंदर्भातील माहिती, कार्यालयीन व सर्व जनतेकरिता आवश्यक माहिती/परिपत्रके आणि संरक्षित पीक वाणांची प्रमाणपत्रे प्रकाशित करण्यात येतात.

## नोंदणीकरण प्रमाणपत्र (Cerificate of Registration):

पिकवाण संरक्षणार्थ केलेल्या अर्जाची परीपुर्तता तपासून परिपूर्ण अर्ज प्राधिकरणाचे कुलसचिव स्विकृत करतात व त्या अर्जदारास प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते. आतागायत १० नवीन, २९२ बियाणे कायदा १९६६ अंतर्गत नोंदणीकृत प्रचलीत प्रसारीत व ३ शेतकरी अशा एकूण ३०५ वाणांकरिता प्राधिकरणातर्फे नोंदणी प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली आहेत. सदर नोंदणीकृत वाणांच्या संरक्षण कालावधी वृक्ष व वेलवर्गीय वाणांकरिता ९ वर्षे तर इतर पिकांच्या वाणांकरिता हाच